


दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217
वर्ष ३ रे अंक : ३८८ वा दि १२ जून २०२६ पृष्ठ ८ किमंत ३ रुपये

# सुनेत्रा पवारांची दादा स्टाइल; राष्ट्रवादीतील दिग्गजांना स्टेजवरुनच फटकारलं, नाव न घेता बरंच काही बोलून गेल्या!

**वृत्तसंस्था- मुंबई**

राष्ट्रवादीत मागील काही दिवसांपासून सुरू असलेला अंतर्गत वाद आणि कुरघोड्यांच्या पार्श्वभूमीवर पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांनी काल झालेल्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात नाव न घेता नेत्यांना सूचक इशारा दिला आहे. तसंच दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासारखी कठोर भूमिका घेण्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत. आत्तापर्यंत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जे घडले ते मी समजून, सावरून घेतले, पण यापुढे असे होऊ देणार नाही. पक्षातील अनुभवी नेते आणि तरुण नेत्यांची ऊर्जा ही यशाची गुरुकिल्ली आहे, पण कुणी पक्षात किती वर्षे काढली, यापेक्षा पक्षासाठी किती काम केले, याचा पदे देताना विचार केला जाईल,फ अशी ठाम भूमिका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी पक्षाच्या २७व्या वर्धानपदिनी, गुरुवारी मांडली. तसेच पक्षात अनावश्यक हस्तक्षेप खपवून घेतला जाणार नाही, असा इशाराही दिला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात अनावश्यक हस्तक्षेप करण्याचा कुणी प्रयत्न केला, तर त्याचा विचार केला जाईल. पक्षाला न्याय देण्यासाठी वेळप्रसंगी अजित पवार यांच्यासारखा कठोर निर्णय घेण्याची वेळ आली, तर तो घेण्यात येईल, असा इशारा पवार यांनी पक्षांतर्गत, तसेच पक्षाबाहेरील राजकीय नेत्यांना दिला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा वर्धापनदिन गुरुवारी दुपारी शीव येथे षण्मुखानंद सभागृहात आयोजित करण्यात आला होता. तुडुंब भरलेल्या सभागृहात अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. पक्षाच्या उभारणीत शरद पवार यांच्यासह इतर नेत्यांच्या योगदानाचा उल्लेख करत सुनेत्रा पवार यांनी कृतज्ञता व्यक्त केली. अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे महाराष्ट्राने कामाचा आणि हक्काचा माणूस गमावल्याची भावना अजूनही जनमानसात आहे. त्यांना अपेक्षित काम करण्याची जबाबदारी पक्षातील प्रत्येकावर आहे. त्यांच्या दूरदृष्टीमुळे मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना अस्तित्वात आली,फ असा उल्लेखही त्यांनी आवर्जून केला. प्रत्येक कार्यकर्ता हा पक्षाचा प्राणवायू आहे. त्याचे कष्ट, समर्पण आणि त्यागाची जाणीव मला आहे. योग्य वेळी प्रत्येकाला न्याय आणि संधी मिळेल. लवकरच विविध महामंडळे आणि त्यावरील सदस्यांची नियुक्ती होईल. यासाठी पक्षनिष्ठा आणि समर्पण हे महत्त्वाचे निकष विचारात घेण्यात येईल. किती वर्षे काम केले, यापेक्षा पक्षाला किती पुढे नेले, याचा विचार केला जाईल,फ असे पवार यांनी स्पष्ट केले. समाजातील सर्व घटकांना सुरक्षित वाटेल अशी भावना रुजवणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे. राजकारणाच्या नावाखाली जाती-धर्मांत फारकत करणाऱ्या प्रवृत्तींना पक्षात कधीही थारा देणार नाही. सर्व समाजघटकांनी गुण्यागोविंदाने नांदावे, यासाठी राजकीय तडजोड करण्याचीही तयारी आपण ठेवली पाहिजे,अशी ठाम भूमिका यावेळी त्यांनी मांडली. राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून गेल्या चार महिन्यांत ही जबाबदारी अतिशय वेगळ्या परिस्थितीत घेतली. ही जबाबदारी घेताना येणाऱ्या सर्व गोष्टींची जाणीव होती. मी पक्षाला सर्वोच्च प्राधान्य देत अजित पवार यांच्या पावलावर पाऊल ठेवून काम करणार आहे. अजित पवार यांनी त्यांच्या हयातीत सगळ्यांचे हट्ट पुरविले, प्रेम केले, सन्मान दिला. पदे दिली. जे जे मागितले ते सगळे देण्याचा प्रयत्न केला. परंतु, मी यापुढे पक्षाच्या हिताला



सर्वोच्च प्राधान्य देईन, असे त्यांनी नमूद केले. पक्षाची बदनामी होणार नाही, याची जबाबदारी माझ्यासह सर्वांची आहे, पण त्यासाठी कठोर भूमिका घेण्याची वेळ येणार नाही, याची सर्वांनी खबरदारी घ्यावी,फ अशी सूचना त्यांनी केली. ङ्ककधी कधी पक्षविस्तारासाठी बाहेरच्या नेत्यांना पक्षात घेतल्यानंतर त्यांचा सन्मान राखण्यासाठी काही तडजोडी कराव्या लागतात, पण असे करताना निष्ठावंतावर अन्याय होणार नाही, याची काळजी घेतली जाईल,फ असा विश्वासही सुनेत्रा पवार यांनी दिला. घरोघरी राष्ट्रवादी, मनोमनी राष्ट्रवादी हे सूत्र घेऊन काम करण्याचे आवाहन त्यांनी केले.

---

# शरद पवारांच्या राष्ट्रवादीने आमच्यात विलीन व्हावं, काँग्रेसचं आवाहन, पक्षातील नेत्याचं सूचक विधान

**वृत्तसंस्था मुंबई**

फुटीच्या उंबरठ्यावर असलेल्या तृणमूल काँग्रेसच्या काँग्रेसमधील विलीनीकरणाबाबत तर्कवितर्क सुरू असतानाच, महाराष्ट्रातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला काँग्रेसने अशाच विलीनीकरणाबाबत थेट आवाहनच केले असल्याचे समजते. भाजपचा सामना करण्यासाठी काँग्रेसमध्ये विलीन व्हावे, अशी हाक पक्षाने दिली असल्याचे खात्रीलायकरीत्या समजते. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेस (शप) पक्षाकडून याबाबत कोणतीही औपचारिक भूमिका जाहीर करण्यात आलेली नाही. देशातील सध्याच्या राजकीय परिस्थितीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजपशी छोटे पक्ष सामना करू शकत नाहीत. आपली जडणघडण एकाच मुशीतून झाली आहे. वेगळा पक्ष काढल्यानंतरही तुम्ही विचारधारेबाबत कधीही तडजोड केलेली नाही. त्यामुळे पुन्हा काँग्रेसचे हात बळकट करून देशाला भाजपरूपी संकटातून वाचवू या,फ असे आवाहन काँग्रेसच्या शीर्षस्थ नेतृत्वाने शरद पवार यांना केल्याचे समजते. याबाबत राष्ट्रवादी शपने औपचारिकरीत्या भूमिका मांडली नसली, तरी आमदार रोहित पवार यांनी विलीनीकरणाबाबत सहेतूक विधान केले आहे. ङ्कविलीनीकरण शक्य आहे; पण दोन्ही पक्षांचे वरिष्ठ नेते निर्णय घेतील,फ असे सांगत त्यांनी शक्यता नाकारलेली नाही. दुसरीकडे शरद पवार यांचे राजकीय मित्र संजय राऊत यांनीही, ङ्कपवार यांनी काँग्रेस मजबूत करावीफ, असे विधान केले आहे. दरम्यान, राष्ट्रवादी शपफ्मधील एका ज्येष्ठ नेत्याशी याबाबत संपर्क साधला असता, त्यांनी सध्या पक्षाच्या ज्येष्ठ फळीत असा मतप्रवाह असल्याचे मान्य केले. मात्र, तांत्रिकदृष्ट्या हे विलीनीकरण शक्य आहे किंवा कसे, याबाबत विचार करावा लागेल. ङ्कपक्ष संघटना व विधिमंडळ पक्ष या दोन्ही घटकांचे दोन तृतीयांश बहुमत या विलीनीकरणासाठी तयार करावे लागेलफ, याकडेही या नेत्याने लक्ष वेधले. राष्ट्रवादी काँग्रेस (शप)च्या खासदार व शरद पवार यांच्या कन्या सुप्रिया सुळे यांनी संजय राऊत यांच्या विधानाबाबत प्रतिक्रिया दिली. संजय राऊत हे माझे मोठे बंधू आहेत व त्यांनी एक चांगली सूचना केली आहे. राजकारणात पुढे काय होणार हे काळच ठरवेलफ, असे त्या म्हणाल्या.

# मूळ मुद्दा बेरोजगारीचा




सरन्यायाधीशांच्या शेऱ्यानंतर झुरळांच्या नावे सुरू झालेल्या कॉक्रोच जनता पार्टीचे (केजेपी) गेल्या आठवड्यात नवी दिल्लीतील आंदोलनाच्या यशापशाची चर्चा सध्या सुरू असून, ती प्रामुख्याने राजकीय दृष्टिकोनातून आहे. ती तशी व्हायला हरकत नसली, तरी त्यात बेरोजगारीचा मूळ मुद्दा हरवणार नाही, हे पाहायला हवे. नवपदवीधर तरुणांमधील बेरोजगारी हा चिंतेचा विषय आहे. देशात उच्च शिक्षणाचा परीघ विस्तारल्याने पदवीधरांची संख्या वाढली तरी तुलनेत रोजगार निर्मिती झाली नाही. आता तर कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे (एआय) रोजगारनिर्मितीचे आव्हान आणखी अवघड बनले आहे. गेल्या तीन दशकांत देशात उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांची संख्या सोळाशेवरून सत्तर हजारांवर गेली. अझीम प्रेमजी विद्यापीठाने अलीकडेच प्रसिद्ध केलेल्या स्टेट ऑफ वर्किंग इंडिया २०२६ या अहवालानुसार, उच्च शिक्षण घेण्याच्या वयोगटातील एक लाख तरुणांच्या मागे महाविद्यालयांची संख्या २०१०मध्ये २९ होती; २०२१मध्ये ती ४५ वर गेली. १८ ते २५ या वयोगटातील उच्च शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण (ग्रॉस एन्रॉलमेंट रेशो) २०१०मध्ये १९ टक्के होते; ते आता २९ टक्क्यांच्या उंबरठ्यावर आहे. गुणात्मक पातळीवरील वाढीचा आणि शिक्षणानंतर चांगल्या वेतनाची शक्यता असणारे व्यावसायिक शिक्षण खासगी क्षेत्रात एकवटल्याचा मुद्दा उपस्थित होऊ शकतो; परंतु तो वेगळ्या चर्चेचा अन् वादाचा विषय आहे. उच्च शिक्षणाच्या सुविधा वाढल्या, तालुक्याच्या शहरांपर्यंत त्या पोहोचल्या हे कोणी नाकारणार नाही. मात्र, खरा प्रश्न आहे, तो वाढलेल्या नवपदवीधरांच्या रोजगाराचा. २००४ ते २०२३ या दोन दशकांत देशात दरवर्षी सुमारे पन्नास लाख नवपदवीधर निर्माण झाले. त्यांपैकी दर वर्षी २८ लाखांना रोजगार मिळाला. म्हणजे सुमारे निम्मे नवपदवीधर रोजगाराविना राहिले. त्यांना पुढे संधी मिळाली असणार यात शंका नाही; परंतु काही बराच काळ रोजगार शोधत राहिलेले असणार. १५ ते २५ वर्षे या वयोगटातील तरुणांतील बेरोजगारीच्या आकड्यावरून ही बाब स्पष्ट होते. या वयोगटातील तरुणांमधील बेरोजगारीचे प्रमाण ४० टक्क्यांपर्यंत आणि २५ ते २९ वर्षे या वयोगटातील तरुणांमधील बेरोजगारीचे प्रमाण २० टक्क्यांपर्यंत असल्याचे स्टेट ऑफ वर्किंग अहवालात म्हटले आहे. २०२३मध्ये २० ते २९ वर्षे या वयोगटातील ६.३ कोटी तरुणांपैकी फक्त १.१ कोटी तरुणांना काम मिळाले होते, असा उल्लेखही अहवालात आहे. रोजगाराच्या बाबतीत दुसरे चित्र आहे, ते तरुणांबद्दलच्या तक्रारींचे. या तक्रारी म्हणजे, काम आहे; परंतु त्यासाठीची कौशल्ये असणारे तरुण मिळत नाहीत आणि नोकरी दिली तरी नवपदवीधर ती करीत नाहीत किंवा काही दिवसांत वा महिन्यांत सोडून देतात. रोजगारासाठी आवश्यक असलेली कौशल्ये पारंपरिक शिक्षणातून पुरेशा प्रमाणात दिली जात नाहीत, असा पहिल्या तक्रारीचा अर्थ होतो. रोजगाराभिमुख शिक्षणाची भाषा सातत्याने केली जात असली, तरी त्यासाठी आवश्यक सुविधा, पुरेसे शिक्षक आणि त्यांचे प्रशिक्षण आणि मुख्य म्हणजे शिक्षण-उद्योग यांच्यातील समन्वय यात आपण कमी पडतो, हे वास्तव आहे. अभियांत्रिकी पदवीधरांपासून आयटीआयमधील तंत्रज्ञांपर्यंत तंत्रकौशल्याचे शिक्षण घेतलेल्यांतील बेरोजगारी ही बाब अधोरेखित करते. दुसऱ्या तक्रारीमागे नवपदवीधरांच्या कामाबद्दलच्या अपेक्षा आणि त्यांचे आर्थिक शोषण ही कारणे असू शकतात. दर वर्षी लाखो रुपये शुल्क भरूनही दरमहा पंधरा ते वीस हजार रुपये वेतन देणारे काम करण्यास नवतरुण उत्सुक नसतात, असा अनुभव आहे. एकंदरीत, प्रमाणात नसलेले रोजगार, नोकऱ्यांचे बदलते स्वरूप आणि वेतनाबद्दलच्या अपेक्षा व वस्तुस्थिती यांत नसलेला मेळ यांमुळे बेरोजगारी वाढतेय. अशा स्थितीत रोजगारनिर्मितीसाठी गांभीर्याने प्रयत्न न झाल्यास नवपदवीधरांतील वैफल्य वाढण्याची भीती आहे; आणि ती धोकादायक ठरू शकते.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# 'सिंधुदुर्ग जिल्ह्याची ऐतिहासिक कामगिरी; घरगणना 100 टक्के पूर्ण करणारा पहिला जिल्हा

**सावंतवाडी/वृत्तसंस्था**

जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्यातील घरगणना मोहिमेत सिंधुदुर्ग जिल्ह्याने ऐतिहासिक कामगिरी नोंदवत महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकावला आहे. अवघ्या २० दिवसांच्या विक्रमी कालावधीत घरगणनेचे १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण करणारा सिंधुदुर्ग हा राज्यातील पहिला जिल्हा ठरला आहे. जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी तृप्ती धोडमिसे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा प्रशासनाने केलेल्या नियोजनबद्ध कामकाजामुळे हा मान जिल्ह्याला मिळाला आहे

जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्यातील घरगणना मोहीम १६ मे २०२६ पासून सुरू करण्यात आली होती. या मोहिमेत जिल्ह्यातील ०८ तहसील कार्यालये,



०३ नगरपरिषदा आणि ०५ नगरपंचायती अशा एकूण १६ कार्यालयांचा सहभाग होता. जिल्ह्यातील २६० पर्यवेक्षक आणि १,४६० प्रगणकांनी अथक परिश्रम घेत १,४५१ घरयादी गटांची गणना यशस्वीरित्या पूर्ण केली.

या यशामागे जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे यांचे सूक्ष्म नियोजन, सातत्यपूर्ण आढावा बैठका, क्षेत्रीय अधिकाऱ्यांना दिलेले मार्गदर्शन आणि प्रत्यक्ष क्षेत्रभेटींतून समस्यांचे तत्काळ निराकरण यांचा मोठा वाटा राहिला. तसेच निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा जनगणना अधिकारी मच्छिंद्र सुकटे यांनी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांमुळे मोहिमेला गती मिळाली. तसेच प्रभारी अधिकारी म्हणून कर्तव्य पार पाडणाऱ्या तहसिलदार आणि मुख्याधिकारी यांनीही आपली जबाबदारी चोखपणे पार पाडली. जिल्हाधिकारी श्रीमती धोडमिसे यांनी सांगितले की, घरगणनेचा टप्पा यशस्वीरित्या पूर्ण झाल्यानंतर आता गुणात्मक पाहणी आणि अनियमितता दुरुस्तीची प्रक्रिया देखील मुदतीत पूर्ण करण्याचे नियोजन प्रशासनाने केले आहे.

जनगणना प्रक्रियेतील स्वगणना (Self Enumeration) टप्पा १ मे ते १५ मे २०२६ या कालावधीत राबविण्यात आला होता. या टप्प्यात जिल्ह्यातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत डिजिटल माध्यमातून मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदविला. एकूण २९ हजार ५११ घरांची स्वगणना पूर्ण झाली असून १७ गावे आणि एका नगरपंचायतीने शंभर टक्के स्वगणनेचे उद्दिष्ट गाठले. यामध्ये वेंगुर्ला तालुक्यातील 'मूठ' हे गाव सर्व कुटुंबांची स्वगणना पूर्ण करणारे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पहिले महसुली गाव ठरले. या यशामुळे जिल्ह्यातील नागरिकांची नागरी जबाबदारीची जाणीव आणि डिजिटल साक्षरता अधोरेखित झाली आहे.

जनगणना मोहिमेच्या यशात जिल्ह्यातील सर्व प्रगणक आणि पर्यवेक्षक यांचे योगदान मोलाचे ठरले. त्यांच्या शिस्तबद्ध कार्यपद्धती, समन्वय, समर्पण आणि टीमवर्कमुळेच ही ऐतिहासिक कामगिरी शक्य झाली. या उल्लेखनीय यशाबद्दल जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे यांनी सर्व प्रगणक, पर्यवेक्षक आणि संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

# पाठबंधारे अधिकाऱ्यांनी सातारा तालुक्याचा प्राधान्याने विचार करण्याची सदस्यांची मागणी

**सातारा/वृत्तसंस्था**

पंचायत समिती गणातील जनतेच्या प्रश्नांसाठी सभागृहात सदस्य पोटतिडकीने भांडत असतात. मुद्दा मांडत असतात. परंतु संबंधित विभागाचे अधिकारी हे जाणीवपूर्वक सभेला येत नाहीत. आले तर कोणाला तरी पाठवून देतात, निर्णय घेणारे अधिकारी येत नाहीत, अशा शब्दात अधिकाऱ्यांना पंचायत समिती सदस्यांनी धारेवर धरले.



दरम्यान, सातारा तालुक्यात मोठी धरणे आहेत, त्या धरणांच्या पाण्यावर तालुक्यातील गावांचा हक्क आहे, पाटबंधारेच्या अधिकाऱ्यांनी विचार करावा, अशीही चर्चा सभेत झाली. पंचायत समितीची मासिक सभा स्व. अभयसिंह महाराज सभागृहात सभापती महेश गाडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी उपसभापती सुषमा जाधव, गटविकास अधिकारी सुशील संसारे, पंचायत समिती सदस्य राहुल शिंदे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

सातारा पंचायत समितीच्या मासिक सभेत विविध शासकीय विभागांच्या कामकाजाचा आढावा घेताना सदस्य आणि पदाधिकाऱ्यांनी अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली. अनेक अधिकारी सदस्यांच्या फोनला प्रतिसाद देत नसल्याने त्यांच्याविरोधात संताप व्यक्त करण्यात आला. काही अधिकाऱ्यांना सदस्यांच्या फोनचीच अलर्जीअसल्याचा आरोपही सभेत करण्यात आला. सार्वजनिक बांधकाम विभाग, महावितरण, कृषी विभाग, एसटी महामंडळ, ग्रामीण पाणीपुरवठा, स्वच्छता अभियान आणि समाजकल्याण विभागांच्या कामकाजावर सविस्तर चर्चा करण्यात आली. ग्रामीण भागातील वीजपुरवठा, नवीन वीज जोडण्या, वीज खांब बदलणे, सौरऊर्जा योजनांची अंमलबजावणी, रस्ते विकास कामे तसेच कृषी योजनांच्या लाभाबाबत सदस्यांनी विविध प्रश्न उपस्थित केले. एसटीच्या ग्रामीण वाहतूक सेवांबाबतही सदस्यांनी समस्या मांडत उपाययोजनांची मागणी केली. दरम्यान, पंचायत समितीच्या सभेला अनुपस्थित राहिलेल्या विभागीय अधिकाऱ्यांबाबतही तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. विनाकारण गैरहजर राहणाऱ्या अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटिसा बजावण्यात येणार असल्याची माहिती पदाधिकाऱ्यांनी दिली. सदस्यांच्या प्रश्नांना उत्तरे देण्यासाठी आणि विकासकामांच्या संबंधित आढाव्यासाठी अधिकाऱ्यांनी सभेला उपस्थित राहणे, ही त्यांची जबाबदारी असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

# माजी आमदार वैभव नाईक यांच्या मालमत्तेची 'एसीबी'कडून पुन्हा

**सावंतवाडी/वृत्तसंस्था**

ठाकरे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख आणि माजी आमदार वैभव नाईक यांच्या बेहिशेबी मालमत्तेच्या चौकशीसंदर्भात पुन्हा एकदा वेगाने हालचाली सुरू झाल्याचे समोर आले आहे. रत्नागिरी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) कणकवली नगरपंचायतीकडे एक पत्र पाठवून वैभव नाईक यांनी खरेदी केलेल्या व्यापारी गाळ्यांबाबत सविस्तर माहिती मागविली आहे. 'एसीबी'च्या या पावलामुळे राजकीय वर्तुळात आणि जिल्ह्यात या प्रकरणाची पुन्हा एकदा जोरदार चर्चा रंगली आहे.

कणकवली शहरामध्ये वैभव नाईक यांनी खरेदी केलेल्या मालमत्तेबाबत 'एसीबी'कडून सध्या सखोल पडताळणी सुरू आहे. संबंधित मालमत्तेमध्ये गाळा नेमका एक आहे की दोन, याबाबत स्पष्ट आणि सविस्तर माहिती सादर करण्याचे निर्देश नगरपंचायतीला देण्यात आले आहेत. या संदर्भातील अधिकृत पत्र रत्नागिरी एसीबीच्या पोलीस उपअधीक्षकांकडून कणकवली नगरपंचायतीच्या मुख्याधिकाऱ्यांना पाठविण्यात आले असल्याचे समजते. संबंधित गाळ्यांची खरेदी सन २००२ आणि २००६ या कालावधीत करण्यात आली होती. दरम्यान, २०२२ पासून वैभव नाईक यांच्या कथित बेहिशेबी संपत्ती प्रकरणी रत्नागिरी एसीबीमार्फत चौकशी सुरू आहे. आता पुन्हा एकदा या जुन्या मालमत्तांची कागदपत्रे आणि तपशील तपासले जात असल्याने या प्रकरणाला नवे वळण मिळण्याची शक्यता आहे. या संपूर्ण प्रकरणावर माजी आमदार वैभव नाईक यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. ते म्हणाले की, "गेल्या पाच वर्षांपासून माझी सातत्याने चौकशी सुरू आहे. आम्ही या चौकशीला पूर्णपणे सामोरे जात आहोत आणि पुढेही जाऊ. मात्र, केवळ राजकीय हेतूने एखाद्या व्यक्तीची पाच-पाच वर्षे पुन्हा पुन्हा चौकशी करून दबाव आणण्याचा प्रयत्न केला जात आहे.

# पावसाळ्यात आंबोली, मळगाव, इन्सुली घाटात वाहतूक ठप्प होण्याची भीती

**सावंतवाडी/वृत्तसंस्था**

पावसाळा सुरू झाला की सावंतवाडी तालुक्यातील आंबोली, मळगाव आणि इन्सुली घाटात वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस पडतो. या काळात घाटातील जुनी आणि धोकादायक झाडे उन्मळून रस्त्यावर पडण्याच्या घटना वारंवार घडतात. यामुळे रस्त्याच्या दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागतात. हा मार्ग आंतरराज्य वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा असल्याने, रस्ता बंद पडल्यास हजारो प्रवाशांची मोठी गैरसोय होते. या पार्श्वभूमीवर, वन विभागाने वन कायद्याचा धाक न दाखवता तातडीने ही धोकादायक झाडे हटवावीत, अशी मागणी प्रवाशांमधून केली जात आहे.

घाटातील रस्त्यावर कोसळण्याची शक्यता असलेली झाडे तोडण्याची मागणी



स्थानिक नागरिक आणि वाहनधारकांकडून सातत्याने केली जाते. मात्र, वन विभाग यावर कोणतीही ठोस कारवाई न करता हातावर हात ठेवून गप्प बसत असल्याचा आरोप होत आहे. झाडे तोडण्यासंदर्भात वारंवार वन कायद्याचा धाक दाखवून प्रशासकीय दिरंगाई केली जात असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. आंबोली हे थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध आहे. पावसाळी पर्यटनाला मोठ्या प्रमाणात गर्दी होते. महाराष्ट्र, गोवा व कर्नाटक राज्याची वाहतूक या घाटातून होते. त्यामुळे आंबोली घाट सुरक्षित असायला हवा. काही वर्षांपूर्वी तत्कालीन जिल्हाधिकारी मंजुलक्ष्मी यांनी आंबोली घाटातील अशा धोकादायक झाडांचा सविस्तर सर्व्हे करण्याचे आदेश दिले होते. त्या आदेशानुसार संबंधित प्रशासनाने सर्व्हे करून किती झाडे धोकादायक आहेत, याचा अहवालही सादर केला होता. मात्र, दुर्दैवाने या अहवालानंतरही प्रशासनाने त्या झाडांना हात लावलेला नाही. हा अहवाल अद्यापही लालफितीत अडकून पडला आहे.

या समस्येची प्रचिती मागील सोमवारीच आली. अचानक वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे आंबोली घाटात अनेक ठिकाणी झाडे उन्मळून रस्त्यावर पडली. परिणामी, घाटातील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आणि दोन्ही बाजूंना वाहनांच्या मोठ्या रांगा लागल्या. अखेर पोलीस आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धावपळ करत युद्धपातळीवर ही झाडे बाजूला केली आणि वाहतूक पूर्ववत केली. पावसाळा आता पूर्णपणे सक्रिय होत असल्याने आंबोली, मळगाव आणि इन्सुली घाटात पुन्हा अशी परिस्थिती निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. एखादी मोठी दुर्घटना घडण्यापूर्वीच जिल्हाधिकाऱ्यांनी या गंभीर समस्येकडे वैयक्तिक लक्ष द्यावे. घाटातील संभाव्य धोकादायक झाडे चिन्हांकित करून ती तातडीने तोडण्याचे आदेश द्यावेत, जेणेकरून पावसाळ्यात प्रवाशांची गैरसोय होणार नाही आणि वाहतूक सुरक्षित राहील, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. मळगाव घाटात झाडांच्या फांद्या तोडल्या,पण काही झाडं अजूनही उन्मळून पडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# कौटुंबिक वाद शिगेला पोहोचला, संतापलेल्या पत्नीनं नवऱ्याला 'नको तेथे मारलं'

**मुंगेर/वृत्तसंस्था**



बिहारमधील मुंगेर जिल्ह्यातील पूर्वसराय पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शाहजुवीर रोड परिसरात पती-पत्नीतील कौटुंबिक वादातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. संतापात पत्नीने पतीच्या गुप्तांगावर धारदार शस्त्राने हल्ला केला. या हल्ल्यात पती गंभीर झाला. या घटनेनंतर महिला आपल्या चार महिन्यांच्या मुलीसह घरातील दागिने घेऊन फरार झाली.

या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. जखमी झालेल्या मोहम्मद फैसल खान यांना त्यांच्या कुटुंबीयांनी तातडीने मुंगेर सदर रुग्णालयात दाखल केले आहे. डॉक्टरांनी त्यांच्या गुप्तांगावर चार टाके घातले असून सध्या त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगितले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, फैसल यांचा विवाह १३ एप्रिल २०२५ रोजी भागलपूर जिल्ह्यातील कबीरपूर येथील इशरत हसन उर्फ सानिया हिच्याशी झाला होता. लग्नानंतर सुरुवातीचे काही महिने सर्व काही सुरळीत सुरू होतं. मात्र, काही काळानंतर दोघांमध्ये वाद होऊ लागला. फैसल यांनी आरोप केला की, त्यांच्या पत्नीचे दुसऱ्या व्यक्तीसोबत अनैतिक संबंध होते आणि ती त्या व्यक्तीशी सतत फोनवर संपर्कात असायची. याच कारणावरून पती-पत्नीमध्ये अनेकदा वाद होत होते. तसेच पत्नीने स्वतंत्र राहण्याची मागणीही केली होती. घटनेच्या आदल्या दिवशीही सानिया आणि फैसल यांच्या आईमध्ये वाद झाल्याचे सांगितले जात आहे. घटनेच्या रात्री फैसल कामावरून घरी परतल्यानंतर दोघांमध्ये पुन्हा वाद झाला. याचदरम्यान संतापाच्या भरात पत्नीने धारदार शस्त्राने त्यांच्या गुप्तांगावर हल्ला केल्याचा आरोप आहे. गंभीर जखमी झालेला फैसल रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. त्यानंतर आरोपी पत्नी घरातून निघून गेली. दरम्यान, पूर्वसराय पोलीस ठाण्याचे अधिकारी सौरभ कुमार यांनी सांगितले की, हा पती-पत्नीमधील कौटुंबिक वादाचा प्रकार आहे. प्राथमिक तपासात पतीकडून पत्नीला मारहाण होत असल्याची माहिती समोर आली आहे. पोलिसांनी दोन्ही बाजूंचे म्हणणे नोंदवून घेतले असून प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे. फैसल यांनी आपल्या मुलीला परत मिळवून देण्याची आणि पत्नीविरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

## प्रेयसीला संपवलं! मृतदेह जंगलात फेकला; हैवान बॉयफ्रेंडचं धक्कादायक कृत्य

**लखनौ/वृत्तसंस्था**

उत्तर प्रदेशची राजधानी लखनौ येथील बीकेटी परिसरातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. सीतापूर जिल्ह्यातील रहिवासी असलेल्या १९ वर्षीय बी.टेक विद्यार्थिनीची निर्घृण हत्या करण्यात आल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणात सर्वात धक्कादायक बाब म्हणजे तिच्या प्रियकरानेच तिचा खून केल्याची कबुली पोलिसांसमोर दिली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, काही महिन्यांपूर्वी ही विद्यार्थिनी नेहमीप्रमाणे कॉलेजला गेली होती. मात्र, दुपारपर्यंत ती घरी परतली नाही म्हणून कुटुंबीयांनी तिचा शोध घेण्याचा प्रयत्न केला, परंतु कोणतीही माहिती मिळाली नाही. त्यानंतर त्यांनी स्थानिक पोलिस ठाण्यात बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली. मात्र, मुलीच्या वडिलांचा आरोप आहे की, २५ मे रोजी तक्रार देऊनही पोलिसांनी तात्काळ कारवाई केली नाही. त्यानंतर २८ मे रोजी मुलीच्या वडिलांनी आंदोलन केल्यानंतर पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपासाला गती दिली. तपासादरम्यान पोलिसांनी विद्यार्थिनीच्या प्रियकराची चौकशी केली. सुरुवातीला तो दिशाभूल करणारी माहिती देत होता. मात्र, पोलिसांनी कसून चौकशी केल्यानंतर त्याने खुनाची कबुली दिली. आरोपीच्या माहितीच्या आधारे बीकेटी आणि सीतापूर पोलिसांचे पथक महिपतपूरच्या जंगलात पोहोचले. तेथे शोधमोहीम राबवण्यात आली. जंगलात सापडलेला मृतदेह अत्यंत वाईट अवस्थेत होता. अनेक दिवसांपासून मृतदेह जंगलात पडून असल्याने त्याचे सांगाड्यात रूपांतर झाले होते. तसेच वन्य प्राण्यांनी मृतदेहाचे मोठ्या प्रमाणात नुकसान केल्याचे पोलिसांनी सांगितले. मुलीच्या वडिलांनी तिच्या कपड्यांवरून आणि चपलांवरून ओळख पटवली. पोलिसांनी सांगाडा ताब्यात घेऊन पुढील तपासासाठी आणि शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. दरम्यान, आरोपी प्रियकराची सखोल चौकशी सुरू असून हत्येमागील नेमके कारण काय होते, याचा शोध घेतला जात आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून, मुलीच्या कुटुंबीयांनी आरोपीला कठोर शिक्षा देण्याची मागणी केली आहे.

## चौघांवर जीवघेणा हल्ला, एकाचा जागीच मृत्यू

**मुंबई :** मुंबईत हत्याकांडाची भयंकर घटना घडली. भरदिवसा एका तरुणाने चौघांवर चाकूने सपासप वार केले. मुंबईतल्या मालाड परिसरात ही घटना घडली. रस्त्यात गाठून तरुणाने चौघांवर चाकूने हल्ला केला. या हल्ल्यात चौघे गंभीर जखमी झाले. जास्त रक्तस्राव झाल्यामुळे एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला. मुंबईच्या कुरार पोलिस ठाणे हद्दीतील अप्पापाडा परिसरात ही धक्कादायक घटना घडली. मालाडच्या अप्पापाडा परिसरात ही घटना घडली. एका व्यक्तीने भरदिवसा ४ जणांवर चाकूने हल्ला केला. या चाकू हल्ल्यात आकाश धोत्रे (वय 28 वर्षे) या तरुणाचा जागीच मृत्यू झाला. तर ३ जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना शताब्दी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. या हल्ल्यामागचे कारण अद्याप अस्पष्ट आहे. कुरार पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल करत तपास सुरू केला आहे. या प्रकरणी कुरार पोलिसांनी दोन जणांना अटक केली. कुरार पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा देखील केला. या घटनेमुळे परिसरात तणावाचे वातावरण आहे.

## अल्पवयीन मुलीची प्रसूतीनंतर बाळ विकलं; दोन डॉक्टरांसह ११ जणांना ठोकल्या बेड्या

**नाशिक/वृत्तसंस्था**



मालेगाव शहरात अल्पवयीन मुलीची बेकायदेशीर प्रसूती करून जन्मलेल्या नवजात बाळाची विक्री केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी दोन नामवंत डॉक्टरांसह एकूण ११ जणांविरुद्ध गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या घटनेमुळे संपूर्ण आरोग्य विभागात खळबळ उडाली असून पोलीस प्रशासनाने तपासाची चक्रे वेगाने फिरवण्यास सुरुवात केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका अल्पवयीन मुलीची एका खाजगी रुग्णालयात प्रसूती करण्यात आली होती. या प्रसूतीनंतर जन्मलेल्या नवजात बाळाची परस्पर विक्री करण्यात आली. या प्रकरणात मालेगाव सामान्य रुग्णालयाचे तत्कालीन वैद्यकीय अधीक्षक राहिलेले डॉ. किशोर डांगे यांच्यासह ११ जणांविरोधात पॉक्सो कायदा तसेच बेकायदेशीर प्रसूती आणि बालकाच्या व्यवहारासंदर्भातील विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. अटक करण्यात आलेल्या डॉक्टरांपैकी काही जण वैद्यकीय क्षेत्रातील परिचित नावे असल्याने या प्रकरणाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. डॉ. किशोर डांगे हे कोरोना महामारीच्या काळात मालेगाव सामान्य रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक म्हणून कार्यरत होते. निवृत्तीनंतर त्यांनी स्वतःचे खासगी रुग्णालय सुरू केले होते. मात्र, मालेगाव सामान्य रुग्णालयात कार्यरत असतानाही ते विविध वाद-विवादांमुळे चर्चेत राहिले होते.

दरम्यान, या प्रकरणातील सर्व आरोपांची सखोल चौकशी पोलीस करत आहेत. या गंभीर प्रकरणामुळे आरोग्य यंत्रणेतील कामकाज, अल्पवयीन मुलींचे संरक्षण आणि बालकांच्या हक्कांबाबत अनेक प्रश्न उपस्थित झाले असून तपासातून नेमके सत्य काय समोर येते याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.


## डोळ्यात मिरची पूड टाकली, दगडाने डोकं ठेचून जिम मालकाची निर्घृण हत्या

**बिलासपूर/वृत्तसंस्था**

छत्तीसगडच्या बिलासपूर जिल्ह्यातून धक्कादायक बातमी समोर आली आहे. जिम मालक आणि बार बाउन्सर असलेल्या एका तरुणाची निर्घृण हत्या करण्यात आली आहे. धक्कादायक म्हणजे ही हत्या क्षुल्लक कारणावरून करण्यात आल्याची माहिती आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेऊन तपास सुरू केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कोनी परिसरातील रहिवासी निखिल गोस्वामी हा बिलासपूरमधील एका बारमध्ये बाउन्सर म्हणून काम करत होता. त्याचबरोबर तो स्वतःची जिमही चालवत होता. गुरुवारी रात्री तो काही कामानिमित्त कोटा येथील आपल्या भाड्याच्या घरात आला होता. त्यावेळी तो काही मित्रांसोबत बसला असताना पाथर्रा गावातील भोला माणिकपुरी तेथे पोचला. यावेळी भोला आणि निखिल या दोघांमध्ये क्षुल्लक कारणावरून वाद सुरू झाला. प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, वाद वाढत गेल्यानंतर आरोपीने निखिलच्या डोळ्यांत मिरची पूड फेकली. त्यानंतर आरोपीने जवळ पडलेल्या जड दगडाने त्याच्यावर वारंवार हल्ला केला. या हल्ल्यात निखिलच्या डोक्याला आणि शरीराच्या इतर भागांना गंभीर दुखापत झाली. या हल्ल्यात निखिलच्या शरीरातून मोठ्या प्रमाणावर रक्तस्राव झाला. घटनेनंतर घटनास्थळी उपस्थित मित्रांनी आणि कुटुंबीयांनी निखिलला तातडीने रुग्णालयात दाखल केले. त्याची प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी त्याला सिम्स बिलासपूर येथे हलवण्यात आले. मात्र उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

घटनेची माहिती मिळताच अतिरिक्त पोलीस अधीक्षक मधुलिका सिंग, डीएसपी नुपूर उपाध्याय आणि कोटा पोलीस ठाण्याचे प्रभारी आकाश चौधरी यांनी पथकासह घटनास्थळी भेट देत तपास सुरू केला. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून पुरावे गोळा केले आहेत. प्राथमिक तपासात वैयक्तिक वाद आणि काही जुन्या मतभेदांचा या प्रकरणाशी संबंध असू शकतो, अशी शक्यता पोलिसांकडून व्यक्त करण्यात आली आहे. मात्र हत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून आरोपीची सखोल चौकशी सुरू आहे.



# वनडे मालिकेतून विराट कोहली बाहेर

## योजनांवर पाणी ; हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे होवू शकत नाही संघात सहभागी

**मुंबई/वृत्तसंस्था**

अनुभवी भारतीय खेळाडू विराट कोहली हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे अफगाणिस्तान विरुद्धच्या आगामी एकदिवसीय मालिकेतून बाहेर पडला आहे. विराटची दुखापत भारतीय संघासाठी एक मोठा धक्का आहे, कारण ही मालिका २०२७ च्या एकदिवसीय विश्वचषकाच्या तयारीच्या सुरुवातीसाठी महत्त्वपूर्ण मानली जात होती. विराट कोहलीने आयपीएलमध्ये जबरदस्त फॉर्म दाखवला होता. त्यामुळे अफगाणिस्तान विरुद्ध विराटकडून चाहत्यांना खूपच आशा होती. आता त्याला झालेल्या दुखापतीमुळे चाहते नक्कीच निराश झाले आहेत. विराटचा खेळ पाहण्यासाठी नेहमीच सगळे उत्सुक असतात. ३७ व्या वर्षीही उत्तम फॉर्ममध्ये विराट असल्यामुळे सर्वांचीच निराशा झाली आहे.



भारताचा माजी कर्णधार आयपीएल २०२६ संपल्यानंतर या मालिकेतून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पुनरागमन करण्यास सज्ज होता, परंतु या दुखापतीने त्याच्या योजनांवर पाणी फेरले. गेल्याच रविवारी, विराटने अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या आयपीएल २०२६ च्या हाय-व्होल्टेज फायनलमध्ये गुजरात टायटन्सविरुद्ध सामना जिंकून देणारे अर्धशतक झळकावले होते. त्याच्या शानदार खेळीमुळे रॉयल चॅलेंजर्स बंगळूरने सलग दुसऱ्यांदा आयपीएल ट्रॉफी जिंकली. विराटने १६ डावांमध्ये ६७५ धावा केल्या, ज्या या मोसमात आरसीबीसाठी सर्वाधिक आणि स्पर्धेतील चौथ्या क्रमांकाच्या सर्वाधिक धावा आहेत. त्याने ५६.२५ ची प्रभावी सरासरी आणि १६५.८४ चा स्ट्राइक रेट राखला.

विराट कोहलीच्या दुखापतीच्या गंभीरतेची पुष्टी करताना, भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या एका सूत्राने सांगितले, हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे तो अफगाणिस्तानविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत सहभागी होऊ शकणार नाही. भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका १३ जून रोजी सुंदर धर्मशाला मैदानावर सुरू होणार आहे, परंतु विराटसारख्या खेळाडूच्या अनुपस्थितीमुळे मालिकेची चमक लक्षणीयरीत्या कमी होईल असा अंदाज लावला जात आहे.

### कर्णधारपदावरून सूर्याची हकालपट्टी करण्याचे संकेत

आयर्लंड आणि इंग्लंड दौऱ्यासाठी भारतीय टी-२० संघाच्या स्क्वॉडची घोषणा येत्या काही दिवसांत करण्यात येईल. अशातच अजित आगरकर एंड कंपनीने टी-२० विश्वकप विजेता कर्णधार सूर्यकुमार यादवची टी-२० संघाच्या कर्णधारपदावरून हकालपट्टी करण्याचे संकेत दिले आहेत. त्यामुळे सूर्यकुमारच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट करिअरचा द एंड झाल्याच्या चर्चा सोशल मीडियावर रंगल्या आहेत. या दौऱ्यांसाठी भारताच्या नव्या कर्णधाराची घोषणा केली जाईल. गतवर्षापासून सूर्यकुमार यादव बाबत अनेक चर्चा रंगल्या होत्या. टीम इंडिया जिंकत होती, पण सूर्यकुमार यादवचा फॉर्मबाबत सतत संघर्ष सुरू होता. गेल्या वर्षी सूर्यकुमारची अत्यंत खराब फॉर्म होता. त्याने २१ इनिंगमध्ये १५ च्या सरासरीनेही धावा केल्या नाहीत. भारतीय क्रिकेट बोर्डाने आता टी-२० संघाच्या भविष्याचा विचार करून नव्या कर्णधाराबाबत विचार सुरु केला आहे.

# इंडोनेशिया ओपन मधील सिंधूचे आव्हान संपुष्टात

## जगातील नंबर-१ एन से यंगकडून सरळ गेममध्ये हरली

**जकार्ता/वृत्तसंस्था**

भारताची स्टार शटलर पीव्ही सिंधू जकार्ता येथे सुरू असलेल्या इंडोनेशिया ओपन बॅडमिंटन स्पर्धेच्या राउंड ऑफ-१६ मधून बाहेर पडली. गुरुवारी तिला जागतिक क्रमवारीत नंबर-१ आणि ऑलिम्पिक चॅम्पियन एन से यंगने २१-१७, २१-१४ अशा फरकाने हरवून स्पर्धेतून बाहेर केले. यंगने सिंधूला सलग दहाव्या सामन्यात हरवले आहे. दक्षिण कोरियाच्या यंगने सिंधूला गेल्या आठवड्यात सिंगापूर ओपनच्या उपांत्यपूर्व फेरीतही हरवून स्पर्धेतून बाहेर काढले होते. सलग दुसऱ्या पराभवामुळे दक्षिण कोरियाच्या खेळाडूविरुद्ध सिंधूचा विक्रम आणखी खराब झाला आहे. सिंधूने आतापर्यंत एन से यंगला एकदाही हरवले नाही.





पहिल्या गेममध्ये सिंधूला एन से यंगने कडवे आव्हान दिले. एका वेळी स्कोअर १०-१० असा बरोबरीत होता आणि भारतीय खेळाडू १५-१४ ने पुढेही गेली होती. पण त्यानंतर एन से यंगने सलग गुण मिळवत आघाडी घेतली. तिने ४१ शॉट्सची लांब रॅली जिंकल्यानंतर पहिला गेम २१-१७ ने आपल्या नावावर केला. दुसरा गेममध्ये दक्षिण कोरियाई खेळाडूने सुरुवातीपासूनच वर्चस्व राखले. तिने १३-६ ची आघाडी घेतली आणि सिंधूच्या परत येण्याच्या प्रयत्नांना निष्फळ करत २१-१४ ने गेम आणि सामना आपल्या नावावर केला. उत्कृष्ट कोर्ट कव्हरेजमुळे यंग जिंकली एन से यंगचे उत्कृष्ट कोर्ट कव्हरेज आणि सतत दबाव निर्माण करण्याची क्षमता सामन्याचे निर्णायक पैलू ठरले. या विजयासह ती उपांत्यपूर्व फेरीत पोहोचली, तर सिंधूला पुन्हा एकदा प्री-क्वार्टर फायनलमध्ये पराभव पत्करून बाहेर पडावे लागले.

# लॉर्ड्स क्रिकेट मैदानाचा ऐतिहासिक विक्रम

**लंडन/वृत्तसंस्था**

न्यूझीलंडचा संघ तीन कसोटी सामन्यांची मालिका खेळण्यासाठी इंग्लंडमध्ये दाखल झाला आहे. यातील पहिला सामना ४ जून रोजी लंडनच्या ऐतिहासिक लॉर्ड्स क्रिकेट मैदानावर खेळला गेला. किवी संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. या नाणेफेकीमुळे लॉर्ड्स क्रिकेट मैदानाने एक असा पराक्रम केला आहे, जो यापूर्वी इतर कोणत्याही मैदानावर झाला नव्हता. सर्वाधिक कसोटी सामन्यांचे आयोजन करण्याच्या बाबतीत लॉर्ड्स आधीच पहिल्या क्रमांकावर आहे आणि इंग्लंड व न्यूझीलंड यांच्यातील हा सामना या मैदानावरचा १५० वा कसोटी सामना आहे.



लॉर्ड्सवर पहिला कसोटी सामना १८८४ मध्ये खेळला गेला होता. इंग्लंडमधील लॉर्ड्स स्टेडियमला जागतिक क्रिकेटमधील एक ऐतिहासिक मैदान मानले जाते, कारण येथे पहिला कसोटी सामना १८८४ मध्ये खेळला गेला होता. तेव्हापासून, इंग्लंडचा दौरा करणाऱ्या बहुतेक संघांनी लॉर्ड्सवर किमान एक सामना खेळला आहे. या स्टेडियमने अनेक मोठ्या स्पर्धांच्या अंतिम सामन्यांचे आयोजन केले आहे, ज्यात लॉर्ड्स क्रिकेट मैदानावर ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या तिसऱ्या आवृत्तीच्या विजेतेपदाच्या सामन्याचा समावेश आहे. इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यातील हा सामना वगळता, त्यापूर्वी खेळल्या गेलेल्या १४९ कसोटी सामन्यांपैकी, प्रथम फलंदाजी करणाऱ्या संघाने ५४ वेळा, तर प्रथम गोलंदाजी करणाऱ्या संघाने ४४ वेळा विजय मिळवला आहे. याशिवाय, ५१ सामने अनिर्णित राहिले आहेत.

# लिओनेल मेस्सी पुन्हा मैदानात उतरण्यास सज्ज

**अर्जेंटिना/वृत्तसंस्था**

फुटबॉलविश्वातील सर्वात मोठा आणि प्रतिष्ठेचा सोहळा फिफा विश्वचषक २०२६ येत्या १२ जूनपासून रंगणार आहे. यंदाचा विश्वचषक अनेक अर्थांनी ऐतिहासिक आणि विशेष ठरणार आहे. प्रथमच या स्पर्धेत तब्बल ४८ संघ सहभागी होणार असून अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिको हे तीन देश मिळून १६ शहरांमध्ये या महास्पर्धेचे सह-आयोजन करणार आहे. या स्पर्धेतील सर्वाधिक चर्चेचा विषय ठरत आहे तो म्हणजे अर्जेंटिनाचा महान फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी. कतार २०२२ च्या फिफा विश्वचषक स्पर्धेत अर्जेंटिनाला विश्वविजेतेपद मिळवून देणारा मेस्सी आता पुन्हा एकदा मैदानात उतरण्यास सज्ज झाला आहे.

३८ वर्षीय मेस्सीसाठी हा विश्वचषक ऐतिहासिक ठरू शकतो, कारण तो आपल्या कारकिर्दीतील सहावा फिफा विश्वचषक खेळण्याच्या उंबरठ्यावर आहे. याशिवाय मेस्सीकडे आता आणखी काही मोठे विक्रम मोडण्याची सुवर्णसंधी आहे. लिओनेल मेस्सीने आपला पहिला विश्वचषक २००६ साली खेळला. त्यानंतर २०१०, २०१४, २०१८ आणि २०२२ अशा सलग पाच स्पर्धांमध्ये त्याने अर्जेंटिनाचे प्रतिनिधित्व केले. आता फिफा विश्वचषक २०२६ मध्ये खेळल्यास तो सहा विश्वचषक खेळणारा इतिहासातील पहिला पुरुष फुटबॉलपटू ठरेल. विशेष म्हणजे पोर्तुगालचा ख्रिस्तियानो रोनाल्डो आणि मेक्सिकोचा गुइलेर्मो ओचोआ यांनाही हा विक्रम करण्याची संधी आहे.

अर्जेंटिनाचा प्रशिक्षक लिओनेल स्कालोनीने याने पुन्हा एकदा मेस्सीवर विश्वास व्यक्त केला आहे. गतविजेता अर्जेंटिना सलग दुसऱ्यांदा विश्वचषक जिंकण्याच्या निर्धाराने मैदानात उतरणार आहे. मेस्सीच्या अनुभवामुळे संघ अधिक मजबूत मानला जात आहे. जर अर्जेंटिनाने पुन्हा विश्वविजेतेपद पटकावले, तर मेस्सी कर्णधार म्हणून दोन फिफा विश्वचषक जिंकणारा इतिहासातील पहिला फुटबॉलपटू बनेल. अर्जेंटिनाने मेस्सीच्या कर्णधारपदाखाली २०१४ आणि २०२२ चे अंतिम सामने खेळले आहेत, त्यामुळे यावेळी अंतिम सामन्यात पोहोचल्यास हा महान कर्णधारपदाचा विक्रमही निश्चित होईल.




# दिवंगत विक्रम गोखले यांचा शेवटचा चित्रपट 'बेवारस-सत्य एका वळणावरचं' चा टीजर लाँच

मराठी रंगभूमी आणि मराठी-हिंदी चित्रपटसृष्टीतील दिग्गज अभिनेते विक्रम गोखले यांच्या अखेरच्या चित्रपटाची पहिली झलक प्रेक्षकांच्या भेटीला आली आहे. 'बेवारस – सत्य एका वळणावरचं' या चित्रपटाचा टीजर नुकताच प्रदर्शित करण्यात आला असून, त्यातील हृदयस्पर्शी कथानक, दमदार कलाकारांची फळी आणि भावनिक मांडणी यामुळे चित्रपटाविषयीची उत्सुकता वाढली आहे. हा चित्रपट २५ जून रोजी जगभर प्रदर्शित होणार आहे.

हरिणी प्रॉडक्शन्स निर्मित आणि शिव आर्यन फिल्म्स प्रस्तुत या चित्रपटाची निर्मिती रिया कुमार, नितीन विचारे आणि शिव आर्यन यांनी केली आहे. चित्रपटाची कथा विजय राणे यांची असून दिग्दर्शन विजय राणे आणि रिया कुमार यांनी केले आहे. क्रिएटिव्ह दिग्दर्शन नितीन विचारे यांचे आहे. चित्रपटाची पटकथा आणि संवाद लेखन शिरीष लाटकर यांनी केले असून गीतलेखन आणि संगीत




दिग्दर्शन विवेक आपटे यांचे आहे. शीर्षक गीताचे लेखन रिया कुमार यांनी केले असून संगीत बिपलाब



दत्ता यांचे आहे. यूजीन डिसोझा आणि योगेश कोळी यांनी छायांकन, अमीर हडकर यांनी पार्श्वसंगीत, तर

यश सुर्वे यांनी संकलनाची जबाबदारी सांभाळली आहे. स्टार कास्टिंग नितीन विचारे यांनी केले आहे. चित्रपटात विक्रम गोखले यांच्यासोबत तेजस्विनी पंडित, रोहिणी हत्तांगडी, उषा नाईक, ऋतुजा बागवे, उदय टिकेकर, श्रीजित मराठे आणि आदित्य देशमुख यांच्यासह अनेक कलाकारांच्या प्रमुख भूमिका आहेत. या चित्रपटात विक्रम गोखले यांनी अनाथालय चालवणाऱ्या तत्त्वनिष्ठ आबाजींची भूमिका साकारली आहे. पायाने अधू असलेल्या एका अनाथ मुलाच्या न्यायासाठीच्या कोर्ट-कचेरीतील संघर्षाची कथा या चित्रपटात उलगडणार आहे. सामाजिक वास्तव आणि मानवी भावनांचा स्पर्श असलेल्या या कथानकामुळे चित्रपटाला वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. टीजरमध्ये विक्रम गोखले यांच्या आर्त आणि भावनिक अभिनयाची प्रभावी झलक पाहायला मिळते. त्यांचा अनुभवसंपन्न अभिनय, हृदयाला भिडणारे कथानक आणि दमदार कलाकारांमुळे प्रेक्षकांना एक उत्कृष्ट सिनेमॅटिक अनुभव मिळणार असल्याची खात्री टीजरमधून दिसून येते.

## प्रवीण तरडे यांचा ट्रोलरवर पलटवार

देऊळ बंद चित्रपटाला प्रेक्षकांचा भरभरून प्रतिसाद मिळाल्यानंतर तब्बल ११ वर्षांनी प्रवीण तरडे यांनी या चित्रपटाचा दुसरा भाग प्रेक्षकांसमोर आणला. मोहन जोशी, स्नेहल तरडे यांच्या प्रमुख भूमिका असणाऱ्या या चित्रपटाला मुंबई, पुण्यामध्ये जबरदस्त प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्रभरात बहुतांश ठिकाणी प्रेक्षकांची पसंती या चित्रपटाला मिळाली. अनेकांनी या चित्रपटाला ट्रोलही केले. यावर अलीकडेच दिलेला मुलाखतीत प्रवीण तरडे म्हणाले 'जे देव मानत नाहीत त्यांना हा सिनेमा जास्त झोंबला. माझ्या देवाचा उदो उदो मीच करणार. त्यामुळे मी तो केला. त्याचा कोणाला त्रास झाला याबद्दल मला काही देणेघेणे नाही. उलट मी जास्त आनंदी झालो. म्हणजे 'तीर निशाने पे लगा है.'

दिग्दर्शक प्रवीण तरडे म्हटले, की एक रांगडा राकट माणूस डोळ्यासमोर येतो. आपल्या चित्रपटाच्या कथानकामुळे, ठसकेबाज, रोखठोक बोलल्यामुळे कायम चर्चेत असतात. अलीकडेच प्रदर्शित झालेल्या देऊळ बंद २ सिनेमात बायकोला प्रमुख रोल दिल्याने त्याच्यावर टीका झाली. शिवाय अनेकांनी श्रद्धेच्या नावावर सुरू असलेला भंपकपणा दाखवत असल्याची टीकाही त्यांच्यावर केली. मात्र, या सगळ्यावर प्रवीण तरडे यांनी थेट उत्तर दिले आहे.

शेतकऱ्यांचा आत्महत्या थांबण्यासाठी माझा देव मैदानात उतरला आहे. शेतकरी बनवून तो बांधा बांधावर फिरला. ग्रामीण भागात थेरडा म्हणण्याची पद्धत आहे. पण देवाने तेही हसत हसत स्वीकारले. कुठल्याही चमत्काराशिवाय शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवली. मी माझ्या धर्माचे - देवाचे पालन केले नाही तर फॉरेनवरून कोणी येणार आहे का? त्यामुळे हे ट्रॉलिंग मी मजेने घेतो असे प्रमाण तरडे म्हणाले.

***





## मल्याळम अभिनेते सलीम कुमार यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन

मल्याळम चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते सलीम कुमार यांनी आपल्या विनोदी अभिनयाने प्रेक्षकांचे मनोरंजन केले आणि विविध प्रकारच्या भूमिका साकारल्या. प्रेक्षकांना त्यांची उणीव प्रकर्षाने जाणवेल. वयाच्या ५७ व्या वर्षी या अभिनेत्याचे निधन झाले आहे.

शनिवारी सकाळी अभिनेते सलीम कुमार यांची प्रकृती खालावली. त्यांना कोची येथील एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते आणि नंतर व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले होते. काही वर्षांपूर्वी सलीम कुमार यांना लिव्हर सिरोसिसचे निदान झाले होते आणि त्यांच्यावर यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रियाही झाली होती. शनिवारी रात्री उशिरा त्यांच्या निधनाची माहिती समोर आल्याने चाहते आणि मल्याळम चित्रपट कलाकारांमध्ये दुःखाची लाट पसरली आहे.

मल्याळम चित्रपटसृष्टीतील दिग्गज ममूटी यांनी सलीम कुमार यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. त्यांनी एका ट्विटमध्ये लिहिले, सलीम, जो स्वतः हसायचा आणि इतरांनाही हसवायचा. जो विचार करायचा आणि इतरांनाही विचार करायला लावायचा. आणि कधीकधी स्वतः रडायचा आणि इतरांनाही रडवायचा. आता, तू फक्त मला रडवत आहेस. प्रिय मित्रा, तुझे जाणे हे एक कधीही न संपणारे दुःख आहे.

चित्रपटांमध्ये येण्यापूर्वी ते नाट्यक्षेत्र आणि नक्कल कलेत कार्यरत होते. त्यांनी १९९७ मध्ये आपल्या चित्रपट कारकिर्दीला सुरुवात केली आणि मल्याळम चित्रपटसृष्टीत विनोदी ते गंभीर अशा विविध प्रकारच्या भूमिका साकारल्या आहेत. सलीम कुमार यांना चार केरळ राज्य चित्रपट पुरस्कार मिळाले आहेत. २०१० मध्ये त्यांना सर्वोत्कृष्ट अभिनेत्यासाठी राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार मिळाला. एक अभिनेता असण्याव्यतिरिक्त, सलीम कुमार मल्याळम चित्रपटसृष्टीत दिग्दर्शक आणि लेखक म्हणूनही सक्रिय होते.



## तापसी पन्नूचे सोशल मीडियावर कमबॅक

बॉलिवूड अभिनेत्री तापसी पन्नू वर्षभर सोशल मीडियापासून दूर राहिल्यानंतर अखेर डिजिटल विश्वात परतली आहे. परतल्यानंतर तिला चाहत्यांनी ती कुठे गायब झाली होती, असे विचारले. याबाबत अभिनेत्रीने धक्कादायक खुलासा केला आहे. सततच्या दबावाला कंटाळून तिने पडद्याबाहेर आपले खरे आयुष्य जगण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले.

तापसीने सांगितले की, जेव्हा तिने सोशल मीडियावर पोस्ट करणे कमी केले, तेव्हा तिचे मित्र आणि चाहते काळजीत पडले. लोक तिला सगळे ठीक आहे ना?, तू कुठे गायब झाली आहेस?, तुझी फीड चित्रपटांच्या पोस्टर्स आणि ब्रँडच्या जाहिरातींनी भरलेली आहे, तू तुझ्या वैयक्तिक आयुष्याबद्दल काहीच का पोस्ट करत नाहीस? असे वेगवेगळे प्रश्न विचारू लागले.

सोशल मीडियावर कमबॅक करताच तापसीने स्पष्ट केले की, तिचे सोशल मीडिया मॅनेज करण्यासाठी तिच्याकडे कोणतीही व्यावसायिक टीम नाही किंवा ती त्यावर पैसेही खर्च करत नाही. तिचे अकाउंट पूर्णपणे अनफिल्टर्ड आणि नैसर्गिक आहे, अगदी तिच्या खऱ्या आयुष्यासारखेच. तापसी म्हणाली,

आजकाल कंपन्या अशा कलाकारांना प्राधान्य देतात जे ऑनलाइन खूप सक्रिय असतात. ती कमी पोस्ट करत असल्यामुळे काही ब्रँडसनी तिच्यासोबत पार्टनरशिप करायला नकार दिला. जाहिराती हे कलाकारांसाठी उत्पन्नाचे प्रमुख साधन आहे आणि कंपन्यांना फक्त प्रसिद्धी हवी असते. आज सोशल मीडिया सेलिब्रिटींसाठी केवळ एक मार्केटिंगचे साधन बनले आहे.

या व्यावसायिक मानसिकतेला तीव्र विरोध करत तापसीने प्रश्न विचारला की, कलाकारांनी मार्केटिंगच्या उद्देशाने स्वतःमध्ये बदल करायला हवा का? ती म्हणाली, जर एखादा ब्रँड माझ्याशी संपर्क साधतो, तर ते माझ्या व्यक्तिमत्त्वामुळे माझी निवड करतात. जर मला त्यांच्यामुळे दुसऱ्या कोणाची तरी भूमिका करावी लागत असेल, तर माझी स्वतःची ओळख तरी कुठे उरते? सोशल मीडिया मनोरंजन विश्वाचा एक भाग असाव पण स्वतःचे अस्तित्व गमावून नाही.

***

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बुलढाण्यात मोफत टेस्ट ट्यूब बेबी मार्गदर्शन शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद...

## अनेक जोडप्यांच्या आशा पल्लवित!

जनसंचलन/बुलढाणा

गर्भधारणेत येणाऱ्या अडचणींमुळे अपत्यसुखापासून वंचित असलेल्या जोडप्यांना आशेचा नवा किरण दाखवणारे मोफत टेस्ट ट्यूब बेबी मार्गदर्शन शिबिर दि ६ जून वार शनिवारी रोजी बुलढाणा येथे अत्यंत उत्साहात संपन्न झाले. डॉ. कविता दराडे यांच्या पॅनेसीया आय.व्ही.एफ. सेंटर आणि डॉ. आशिष सावळे यांच्या आनंदी हॉस्पिटल (छत्रपती नगर, बुलढाणा) यांच्या संयुक्त विद्यमाने या भव्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला बुलढाणा जिल्हा सह इतर जिल्ह्यातून शेकडो जोडप्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शिबिरादरम्यान तज्ज्ञ डॉक्टरांनी उपस्थित जोडप्यांना आधुनिक वैद्यकीय पद्धतींविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत वंध्यत्वाची समस्या वाढत असली, तरीही आधुनिक आय.व्ही.एफ.तंत्रज्ञानाच्या साहाय्याने त्यावर यशस्वी मात करणे आणि मातृत्वाचे स्वप्न पूर्ण करणे आता सहज शक्य झाले आहे, असा विश्वास डॉक्टरांनी यावेळी व्यक्त केला. या शिबिरामध्ये स्त्री आणि पुरुष दोघांमधील वंध्यत्वाची कारणे व त्यावरील उपायांवर प्रकाश टाकण्यात आला. प्रामुख्याने: पुरुषांमधील शुक्राणूंची कमतरता आणि कमी हालचाल. स्त्रियांमधील गर्भनलिकेतील अडथळे, गर्भाशयातील गाठी, एन्डोमेट्रिओसिस आणि अनियमित मासिक पाळी यांसारख्या गुंतागुंतीच्या समस्यांवर तज्ज्ञांनी वैयक्तिकरीत: मोफत समुपदेशन केले.ज्या जोडप्यांना काही कारणास्तव कालच्या शिबिरात येता आले नाही, ते पॅनेसीया आय.व्ही.एफ. सेंटरच्या ८९५ ८९५ ६९९६ या क्रमांकावर संपर्क साधून पुढील सल्ला घेऊ शकतात, असे आयोजकांच्या वतीने सांगण्यात आले आहे.



## २० जोडप्यांना ३० हजारांची विशेष सूट!

**शिबिराचे औचित्य साधून आधीच जाहीर केल्याप्रमाणे, सुरुवातीला नोंदणी करणाऱ्या पहिल्या २० भाग्यवान जोडप्यांना पॅकेजवर थेट ₹३०,०००/- ची घसघशीत सूट देण्यात आली. या सवलतीमुळे आर्थिकदृष्ट्या गरजू जोडप्यांना मोठा दिलासा मिळाला असून, त्यांचे उपचाराचे स्वप्न पूर्ण होणार आहे.**



## नागरिकांकडून कृतज्ञता व्यक्त

**अनेक वर्षांपासून उपचार करूनही पदरी निराशा आली होती, पण आज येथील डॉक्टरांशी बोलून मनात सकारात्मकता निर्माण झाली आहे, अशी भावना शिबिरात आलेल्या एका जोडप्याने व्यक्त केली. अत्यंत सुयोग्य नियोजन आणि तज्ज्ञ डॉक्टरांच्या आपुलकीच्या मार्गदर्शनामुळे हे शिबिर अनेक कुटुंबांसाठी आनंदाची नवी पहाट घेऊन येणारे ठरले आहे.**

# प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानांतर्गत जिल्हाभर विशेष आरोग्य शिबिरे; १ हजार ६०२ गरोदर मातांची तपासणी

जनसंचलन/बुलढाणा

प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान () अंतर्गत जिल्हाभर विशेष आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले. आरोग्य शिबिरांमध्ये एकूण १ हजार ६०२ गरोदर मातांची तपासणी करुन त्यांना आवश्यक उपचार, समुपदेशन व आरोग्यविषयक मार्गदर्शन करण्यात आले. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते व जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार यांच्या मार्गदर्शनाखाली प्राथमिक आरोग्य केंद्र हतेडी येथे जिल्हास्तरीय विशेष आरोग्य शिबिर उत्साहात पार पडले. शिबिराचे उद्घाटन जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. मिलिंद जाधव तथा तालुका आरोग्य अधिकारी डॉ. महेंद्र सरपाते यांच्या हस्ते झाले. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. अरुण जंवजाळ तसेच जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी राजेश धुतडमल उपस्थित होते. प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानांतर्गत जिल्ह्यातील सर्व आरोग्य संस्थांमध्ये विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले. शिबिरात कार्यक्षेत्रातील तसेच कार्यक्षेत्राबाहेरील गरोदर मातांची स्त्रीरोग तज्ज्ञांच्या उपस्थितीत सखोल आरोग्य तपासणी करण्यात आली. जोखीमग्रस्त (हाय रिस्क) गर्भवती महिलांची विशेष तपासणी करून त्यांना आवश्यक उपचार, समुपदेशन व आरोग्यविषयक मार्गदर्शन देण्यात आले. यावेळी प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (आयुष्मान भारत) अंतर्गत ई-केवायसी शिबिराचेही आयोजन करण्यात आले. पात्र लाभार्थ्यांची ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करून त्यांना आयुष्मान भारत कार्डांचे वितरण करण्यात आले. शिबिरादरम्यान सर्व एएनसी मातांची हिमोग्लोबिन, रक्तातील साखर, एचआयव्ही, रक्तदाब, वजन तसेच सोनोग्राफीसह विविध आवश्यक वैद्यकीय तपासण्या करण्यात आल्या. गर्भधारणेदरम्यान घ्यावयाची काळजी, संतुलित व पोषक आहाराचे महत्त्व आणि नियमित आरोग्य तपासणीची आवश्यकता याबाबत गरोदर महिलांचे समुपदेशन करण्यात आले. प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानाला दहा वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर देशभरात ची दहा वर्षे, सुरक्षित गर्भधारणा, निरोगी माता, सक्षम भारत या संकल्पनेवर आधारित विशेष उपक्रम राबविण्यात येत आहेत. जिल्ह्यात आयोजित विशेष आरोग्य शिबिरांमध्ये एकूण १ हजार ६०२ गरोदर मातांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ३९४ माता जोखीमग्रस्त आढळून आल्या असून त्यांना विशेष वैद्यकीय सेवा व समुपदेशन देण्यात आले. तसेच २४० मातांची सोनोग्राफी तपासणी करण्यात आली. अधिक उपचारांची आवश्यकता असलेल्या २१६ मातांना उच्चस्तरीय आरोग्य संस्थांकडे संदर्भित करण्यात आले. सुरक्षित मातृत्व व माता-बाल आरोग्य संवर्धनासाठी अशा उपक्रमांचे विशेष महत्त्व असल्याचे मान्यवरांनी सांगितले. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र हतेडी तसेच जिल्ह्यातील सर्व आरोग्य संस्थांमधील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

# पर्यटन क्षेत्रातील उद्योजकांसाठी ‘अमृत पर्यटन उद्योजकता कौशल्य विकास कार्यक्रम

जनसंचलन/बुलढाणा

महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्था महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) यांच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या ‘अमृत पर्यटन’ उपक्रमांतर्गत पर्यटन क्षेत्राशी संबंधित उद्योजक, व्यावसायिक आणि नवउद्योजकांसाठी उद्योजकता कौशल्य विकास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. बुलढाणा जिल्ह्यातील पर्यटन व्यवसायाशी संबंधित सर्व घटकांनी तसेच स्वयंरोजगाराच्या संधी शोधणाऱ्या युवक-युवतींनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. पर्यटन क्षेत्र हे रोजगारनिर्मिती, स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देणारे आणि उद्योजकतेच्या नव्या संधी निर्माण करणारे महत्त्वाचे क्षेत्र मानले जाते. याच पार्श्वभूमीवर अमृत संस्थेने पर्यटन क्षेत्रातील उद्योजकांना सक्षम करण्यासाठी तसेच नवीन व्यावसायिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी हा विशेष उपक्रम हाती घेतला आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमात टूर अँड ट्रॅव्हल्स व्यावसायिक, पर्यटक मार्गदर्शक (टुरिस्ट गाईड्स), कुक अँड केटरर्स, होमस्टे व रिसॉर्ट संचालक, धार्मिक व सांस्कृतिक पर्यटनाशी संबंधित उद्योजक, पर्यटन सेवा पुरवठादार तसेच पर्यटन क्षेत्रात नवीन व्यवसाय सुरू करू इच्छिणारे युवक-युवती सहभागी होऊ शकतात. प्रशिक्षणादरम्यान व्यवसाय उभारणी व विस्तार, व्यवसाय नियोजन, डिजिटल मार्केटिंग, आधुनिक विपणन तंत्रज्ञान, ग्राहक व्यवस्थापन, आर्थिक नियोजन, ब्रँडिंग, पर्यटन क्षेत्रातील नवीन व्यवसाय संधी तसेच शासनाच्या विविध योजना व आर्थिक सहाय्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले जाणार आहे. याशिवाय पर्यटन क्षेत्रातील अनुभवी तज्ज्ञ आणि यशस्वी उद्योजकांचे मार्गदर्शनही सहभागींसाठी उपलब्ध करून दिले जाणार आहे. बुलढाणा जिल्ह्यातील लोणार सरोवर, शेगाव, सिंदखेड राजा आणि ज्ञानगंगा अभयारण्य यांसारख्या पर्यटनस्थळांच्या पार्श्वभूमीवर पर्यटन व्यवसायासाठी मोठ्या संधी उपलब्ध असून, या संधींचा लाभ घेण्यासाठी हा कार्यक्रम उपयुक्त ठरणार आहे. तसरा मजला, बुलढाणा प्राइड बिल्डिंग, तहसील कार्यालयासमोर, बुलढाणा ४४३००१ येथे संपर्क साधावा.

# खडकपूर्णा लाईन फुटली, लाखो लिटर पाणी वाया! तहानलेल्या बुलढाण्याच्या जखमेवर प्रशासनाचे मीठ?

जनसंचलन/बुलढाणा

आधीच तीव्र पाणीटंचाईने हैराण झालेल्या बुलढाणा शहरासाठी आणखी एक धक्कादायक आणि संतापजनक प्रकार समोर आला आहे. शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकपूर्णा धरणाच्या मुख्य पाईपलाईनला गळती लागल्याने लाखो लिटर मौल्यवान पाणी अक्षरशः वाया जात असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. एकीकडे नागरिकांना पाण्यासाठी प्रतीक्षा करावी लागत आहे, मर्यादित वेळेतच पाणीपुरवठा होत आहे, तर दुसरीकडे प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे मोठ्या प्रमाणात पाण्याची नासाडी सुरू असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. उन्हाळ्याच्या झळा, घटती पाणीपातळी आणि शहरावर आलेले पाणीटंचाईचे सावट अशा परिस्थितीत ही गळती म्हणजे बुलढाणेकरांच्या सहनशीलतेची परीक्षा ठरत आहे. खडकपूर्णा धरणावरून येणाऱ्या पाण्यावर शहरातील हजारो नागरिक अवलंबून आहेत. अशा वेळी मुख्य लाईनला गळती होऊन पाणी वाया जाणे ही केवळ तांत्रिक चूक नसून नियोजनशून्य कारभाराचे ठळक उदाहरण असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. संबंधित विभागाने तातडीने जागेवर पाहणी करून पाईपलाईनची दुरुस्ती करावी, गळती कायमची थांबवावी आणि पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे. अन्यथा पाणीटंचाईचा उद्रेक प्रशासनाला महागात पडू शकतो.



# साकेगाव येथील फासे पारधी समाजावर अमानुष हल्ला

## हल्लेखोरांवर कठोर कारवाई करा पारधी विकास परिषदेची मागणी

## रायपूर पोलिस स्टेशनला तक्रार दाखल...

जनसंचलन/बुलढाणा



रायपूर पोलिस स्टेशन अंतर्गत असलेल्या मौजे साकेगाव येथे दि. ९ जून रोजी रात्री येथील फासे पारधी समाजातील महिला पुरुष व लहान मुलावर गावातील गावगुंड तरूणांनी पिण्याच्या पाण्याच्या वादातून अमानुष हल्ला चढविला या हल्लयात महिलांवर लाठीकाठ्यांनी जबर मारहान करण्यात आली. जखमी महिलांना सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून या संदर्भात रायपूर पोलिस स्टेशनला तक्रार दाखल करण्यात आली असून आरोपी फरार आहेत. हल्लेखोरांवर कठोर कारवाई करावी अशी मागणी पारधी विकास परिषद बुलढाणाचे अध्यक्ष युवराज पवार महासचिव रत्ना पवार, उपाध्यक्ष राजेंद्र पवार यांनी जिल्हाधिकारी या दि. ११ जून रोजी निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे मौजे साकेगाव (रायपूर पोस्टे) येथील फासे पारधी समाजातील २१ महिला पुरुष लहान मुलांवर गावातील ४५ ते ५० गावगुंडानी दि. ९ जून रोजी रात्री ८: ते ९ वाजेदरम्यान पिण्याच्या पाण्याच्या वादातून हल्ला चढविला या हल्यात अर्चना भोसले हिच्या छातीवर वार करण्यात आले. जुली पवार हिचे दात पाडले. हात मोडले लाठ्याकाठ्यांनी जबर मारहाण करण्यात आली. बिनोज भाई पवार यांच्या डोक्यावर कुऱ्हाडीने वार करण्यात आले. नितुसिन्हा पवार यांच्या पायावर व हातावर मारहाण करण्यात आली शर्मिला पवार निलम बागुल, रिता पवार, संध्या पवार, दऱ्या पवार, विजय युवराज पवार यासह इतरांना लाठ्याकाठ्यांनी मारहाण करण्यात आली. गंभीर मारहाण झालेल्या महिला सामान्य रुग्णालय बुलढाणा येथे उपचार घेत आहे. उपचार घेऊन परतणाऱ्या महिलांना शारिरिक इजा करण्याची धमकी व शिवीगाळ करण्यात आली. रायपूर पोस्टेला १९ जणांविरूद्ध ॲट्रासिटी ॲक्ट प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले आहे. अद्याप या गावगुंडाना पोलिसांनी अटक केली नाही. घराची व दुकानांची तोडफोड चारचाकी वाहनांची तोडफोड घरातील वस्तू व धान्य व रोख रक्कम नुकसान भरपाई देण्यात यावी तसेच आरोपींना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करावी अन्यथा सर्व फासे पारधी समाज संघटना आंदोलन छेडतील अशा इशारा देण्यात आला आहे. या निवेदनावर इंद्रराज पवार, विक्की भोसले, वदंना पवार, संजय भोसले, अक्षय पवार, रेश्मा भोसले, राजा पवार, नरेश भोसले, अबेदान पवार विरोद भाई पवार यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# महाराष्ट्र संतांची भूमी की गुंडांची?

## बालकृष्ण महाराजांवरील हल्ल्याने सिंदखेडराजा पेटला

जनसंचलन/ सिंदखेडराजा



येथे गौ सन्मान अभियानाचे महाराष्ट्र प्रभारी पूज्य संत श्री बालकृष्ण जी महाराज यांच्यावर झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ मंगळवारी हजारोंच्या उपस्थितीत भव्य निषेध मोर्चा व सभा पार पडली. संत समाज, सकल हिंदू समाज, गोभक्त, वारकरी संप्रदाय तसेच विविध धार्मिक व हिंदुत्वनिष्ठ संघटनांच्या सहभागाने संपूर्ण सिंदखेडराजा परिसर संतापाने दणाणून गेला. प्रकृती अस्वास्थ्यामुळे पूज्य बालकृष्ण जी महाराज सभेला उपस्थित राहू शकले नाहीत. मात्र त्यांनी संदेशातून हा हल्ला अत्यंत गंभीर व प्राणघातक स्वरूपाचा असल्याचे सांगत, घटनेत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहभागी असलेल्या सर्वांवर तात्काळ गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्याची मागणी केली. मला शासन आणि प्रशासनाकडून न्यायाची अपेक्षा आहे, असा स्पष्ट संदेश त्यांनी दिला. आंतरराष्ट्रीय कथावाचक युवाचार्य संत श्री विवेकदास जी शास्त्री महाराज यांनी प्रशासनाला इशारा देत सांगितले की, हा मोर्चा संत समाजाच्या आक्रोशाची केवळ सुरुवात आहे. न्याय मिळाला नाही, तर सिंदखेडराजाच्या भूमीवर देशभरातील संत-महंतांचा भव्य महाकुंभ भरू शकतो. स्वामी श्री अमोलनंद सरस्वती महाराज, हिंदुत्ववादी नेते मिलिंद एकबोटे, महाराष्ट्र गौ सेवा आयोगाचे सदस्य उद्धवजी नेरकर, गजानन महाराज सपकाळ यांच्यासह अनेक संत-महंतांनी हल्ल्याचा तीव्र निषेध नोंदवला. सभेत सर्व आरोपींना तात्काळ अटक, निष्पक्ष चौकशी आणि कठोर कायदेशीर कारवाईची एकमुखाने मागणी करण्यात आली. संघटित स्वरूपात हिंसक कृत्य झाल्याचा आरोप असल्याने आवश्यक निकष पूर्ण होत असल्यास मोका अंतर्गत कारवाईचा विचार करावा, अशी मागणीही करण्यात आली. सभेनंतर प्रशासनाला निवेदन देण्यात आले. संतांचा सन्मान आणि कायद्यावरील विश्वास टिकवायचा असेल, तर दोषींना कठोर शिक्षा झालीच पाहिजे,असा इशारा संत समाजाने दिला.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन

आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन

===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====

संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८